**अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग, मुंबई यांना मानधन व अनुषंगिक भत्ते मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: राकृमूआ-२०२५/प्र.क्र.१०२/१०-अे (E-११४९५३१)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १० जून, २०२६

**संदर्भ:** - १. शासन निर्णय, कृषि विभाग क्र. मंत्रीदर्जा-२०२३/प्र.क्र.४१/राकृमूआ,दि.२१.११.२०२३
२. या विभागाचे ज्ञापन क्र. कृपवि-९८२४/प्र.क्र.५७/प्रशा-१, दि.२८.६.२०२४
३. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक कृपवि-३५२४/प्र. क्र.३५६/प्रशा-१, दिनांक २३.०९.२०२४
४. शासन निर्णय कृषि ,व पदुम विभाग क्र.कृवपदुम-२१०१०/१३/२०२५-MAG-१०A (ई-९३२४९०), दिनांक ०२.०६.२०२५
५. शासन निर्णय कृषि ,व पदुम विभाग क्र. राकृमूआ-२०२५/प्र.क्र.१०२/१०-अे (E-११४९५३१), दिनांक ०३.०९.२०२५
६. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६

**प्रस्तावना:-**

श्री. सय्यद पाशा उस्मानसाहब पटेल, अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग, मुंबई यांना या विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मंत्री दर्जा देण्यात आलेला आहे. तसेच त्यांना संदर्भ क्र. २ येथील ज्ञापनान्वये शासन सोयी सुविधा देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

२. श्री. पाशा पटेल, अध्यक्ष (मंत्री दर्जा), राज्य कृषि मूल्य आयोग यांना महाराष्ट्र मंत्र्यांचे भत्ते नियम, १९५६ नुसार मंत्री पदासाठी देण्यात येणारे मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. महाराष्ट्र मंत्र्यांचे भत्ते नियम, १९५६ नुसार मंत्री पदासाठी देण्यात येणारे वेतन हे मुख्य सचिवांचे मूळ वेतन व महागाई भत्ता व इतर भत्ते असे निश्चित करण्यात आले आहे.

३. मा. श्री. पाशा पटेल यांचे माहे मार्च, २०२६ आणि माहे एप्रिल, २०२६ या कालावधीत अदा करावयाचे मानधन व इतर अनुषंगिक भत्ते वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत निधी मधून मा. श्री. पाशा पटेल यांचे माहे मार्च, २०२६ आणि माहे एप्रिल, २०२६ या कालावधीतील एकूण रू. ७,४१,५००/- (रू. सात लाख एकेचाळीस हजार पाचशे फक्त) इतके मानधन अदा करण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | माहे | मानधनाचा तपशिल | | मानधनाची रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मार्च, २०२६ | मूळ वेतन | २,२५,०००/- | ३,७०,७५०/- X २ | आयकर कपात करुन अदा करावे |
| | | महागाई भत्ता (५५%) | १,२३,७५०/- | | |
| | | दूरध्वनी भत्ता | १२,०००/- | | |
| | | संगणक भत्ता | १०,०००/- | | |
| | | | एकूण | ७,४१,५००/- | |

२. संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग यांचे मानधन व इतर अनुषंगिक भत्ते यासाठी खालील नवीन लेखाशिर्षास मान्यता देण्यात आली आहे. तरी परिच्छेद क्र. ३ येथे दर्शविल्याप्रमाणे श्री. पाशा पटेल, अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग यांचे माहे मार्च, २०२६ आणि माहे एप्रिल, २०२६ या कालावधीतील मानधन व भत्त्यासाठी दरमहा येणारा खर्च पुढील लेखाशीर्षाखाली संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावाः-

"मागणी क्रमांक डी-३
२४०१ पीक संवर्धन
००,
१११ कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी
(००)
(००) (१२) अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग यांचे मानधन व इतर अनुषंगिक भत्ते
(अनिवार्य)(२४०१ बी५७१)
२८ व्यावसायिक सेवा

३. सदर खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम आहरित करुन श्री.पाशा पटेल, अध्यक्ष (मंत्री दर्जा), राज्य कृषि मूल्य आयोग, मुंबई यांना अदा करण्यासाठी अवर सचिव (रोख शाखा), कृषि व पदुम विभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि उप सचिव (रोख शाखा), कृषि व पदुम विभाग यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार श्री. पाशा पटेल, अध्यक्ष (मंत्री दर्जा), राज्य कृषि मूल्य आयोग, मुंबई यांना मानधन व भत्ते अदा करण्याची कार्यवाही रोख शाखेमार्फत करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

५.    सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०६१०१६५६२३६९०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ATUL NARHARI KULKARNI

Digitally signed by ATUL NARHARI KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=E7C5A611BC2AADC15956A0762A0B8D94BB26A280EDEEFB41F14416811A8ACC69, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F040522B06DFD4ABCDE03A7DBC281E33BB2B3CA0148639F3A48CC8D1401646D5, cn=ATUL NARHARI KULKARNI
Date: 2026.06.10 16:57:20 +05'30'

**( अतुल कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२. मुंबई/नागपुर
३) श्री पाशा पटेल, अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग, कावसजी दिनशा ट्रस्ट, झोरोस्ट्रीयन बिल्डिंग, फोर्ट, मुंबई
४) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
५) कुलगुरु / कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
६) उप सचिव (प्रशासन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७) नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
८) सहायक लेखाधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
९) सह संचालक, राज्य कृषि मूल्य आयोग, मुंबई (पूर्वीचे शेतमाल भाव समिती कक्ष, मुंबई)
१०) अवर सचिव/ कक्ष अधिकारी (२-ए/ ७-ए/१०-ए/ रोखशाखा), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११) कक्ष अधिकारी (व्यय-१/ अर्थ-१३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) निवड नस्ती.